# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग
### परिपत्रक क्र. ४७० /२०२२

विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांसाठी सामुहिक वैद्यकीय विमा योजना आणि सामुहिक वैयक्तिक अपघात योजना व त्यांच्या नातेवाईकांसाठी सामुहिक वैद्यकीय विमा योजना दि. ११ नोव्हेंबर, २००४ पासून राबविण्यात येत आहे. सदर पॉलिसी ही Floater Policy या प्रकारची आहे. सेवक व सेवकांचे नातेवाईक मिळून विम्याची सध्याची कमाल मर्यादा दि. ११/११/२०१५ पासून रुपये ३ लाख करण्यात आलेली आहे तसेच दि. ११/११/२०१८ पासून नातेवाईकांची संख्या ३ वरून ५ वाढविण्यात आलेली आहे.

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार १९ व्या वर्षी (दि. ११/११/२०२२ ते १०/११/२०२३) विमा पॉलिसीचे दि ओरिएण्टल इन्शुरन्स कंपनीकडे नूतनीकरण करण्यात आलेले असून पॉलिसीच्या क्लेमबाबतचे कामकाज एमडी इंडिया हेल्थ इन्शुरन्स टीपीए प्रा. लि., पुणे करणार आहेत.

सेवकांचा विमा हप्ता म्हणून १००% रक्कम व सेवकांच्या नातेवाईकांची विमा हप्त्याची ५०% रक्कम विद्यापीठ निधीतून अदा करण्यात आली असून ५०% रक्कम सेवकाच्या माहे डिसेंबर, २०२२ ते फेब्रुवारी, २०२३ च्या वेतनातून कपात करण्यात येणार आहे. ती खालीलप्रमाणे

| विद्यापीठ निधीतून अदा केलेली रक्कम रू. | | | सेवकांच्या वेतनातून नातेवाईकांची वसूल करावयाची ५०% रक्कम रू. | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सेवक रु. | नातेवाईक रु. | एकूण रक्कम रु. | माहे डिसेंबर २०२२ वेतनातून कपात होणारी रक्कम रु. | माहे जानेवारी २०२३ वेतनातून कपात होणारी रक्कम रु. | माहे फेब्रुवारी २०२३ वेतनातून कपात होणारी रक्कम रु. | एकूण कपात होणारी रक्कम रु. |
| २०७५६.२० | ३३६६.५४ एक नातेवाईक | २४१२२.७४ | ५६१/- | ५६१/- | ५६१/- | १,६८३/- |
| २०७५६.२० | ६७३३.०८ दोन नातेवाईक | २७४८९.२८ | १,१२३/- | १,१२२/- | १,१२२/- | ३,३६७/- |
| २०७५६.२० | १००९९.६२ तीन नातेवाईक | ३०८५५.८२ | १,६८४/- | १,६८३/- | १,६८३/- | ५,०५०/- |
| २०७५६.२० | १३४६६.१६ चार नातेवाईक | ३४२२२.३६ | २,२४५/- | २,२४४/- | २,२४४/- | ६,७३३/- |
| २०७५६.२० | १६८३२.७० पाच नातेवाईक | ३७५८८.९० | २,८०६/- | २,८०५/- | २,८०५/- | ८,४१६/- |

२..

ज्या सेवकांनी आपल्या नातेवाईकांची नावे नव्याने समाविष्ट करण्याबाबत माहिती वित्त व लेखा विभागास दि.०५/११/२०२२ पर्यंत कळविलेली नाहीत परंतु सदर माहिती दि.०६/११/२०२२ ते ०५/१२/२०२२ या कालावधीमध्ये या विभागास सादर केलेली आहे अशा नातेवाईकांसाठी पुरवणी विमा पॉलिसी काढण्यात आलेली आहे. सदर पॉलिसीच्या बाबतीत विमा कंपनीने नातेवाईकांसाठी (पती / पत्नी व जास्तीत जास्त २ मुले तसेच आई, वडील, सासू, सासरे यांच्यासाठी) विमा हप्ता खालीलप्रमाणे कपात करण्यात येईल.

| नातेवाईकांचे प्रकार | एकूण विमा हप्ता रु. | सेवकाने भरावयाची विमा हप्त्याची रक्कम रु. | विद्यापीठ भरणार असलेल्या विमा हप्त्याची रक्कम रु. |
|---|---|---|---|
| पती / पत्नी व जास्तीत जास्त २ मुले | ३,३६७/- प्रती नातेवाईक | १,६८३.५०/- प्रती नातेवाईक | १,६८३.५०/- प्रती नातेवाईक |
| आई, वडील, सासू, सासरे | १२,०६२/- प्रती नातेवाईक | ६,०३१/- प्रती नातेवाईक | ६,०३१/- प्रती नातेवाईक |

**विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वैद्यकीय विमा योजनेविषयीची माहिती पुढील लिंकवर ठेवण्यात आलेली आहे. Home Page > Circulars > Mediclaim Policy**

एमडी इंडिया हेल्थ इन्शुरन्स टी. पी. ए. प्रा. लिमीटेड यांचे प्रतिनिधी म्हणून श्रीमती दिप्ती शिंदे (मोबाईल क्रमांक **7391059755**) हे काम पहात आहे. तसेच विद्यापीठामध्ये श्री. स्नेहल घोलप (मोबाईल क्रमांक **9011797459**) हे विमा पॉलिसीचे काम पहात आहे.

सदर परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे सेवकांच्या नातेवाईकांचा विमा हप्ता कपात करण्यात येणार आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

**सीएमए चारूशीला गायके**
**वित्त व लेखा अधिकारी**

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०२२-२३/१०८८
दिनांक : १२ डिसेंबर, २०२२

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. विभागप्रमुख
सर्व शैक्षणिक विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२. मा. शाखाप्रमुख
सर्व प्रशासकीय शाखा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

) यांना विनंती करण्यात येते की, आपल्या विभागामधील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास प्राधान्याने सदरचे परिपत्रक आणावे.